पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर
नविन प्रशासकिय इमारत संकुल, प्लॉट नं. १, सेक्टर – १५
मोरेकुरण रोड, कोळगाव, नवनगर, ता. जि. पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

प्रेसनोट क्र.८० दिनांक २२/०९/२०२६

वॉकीटॉकीचा वापर करुन महिलेची फसवणुक करुन ए.टी.एम कार्ड व पासवर्ड मिळवून खात्यातील रक्कम लंपास करणाऱ्या आरोपीस पालघर पोलीसांकडून अटक.

दिनांक १४/०९/२०२६ रोजी ११.३० वाजता फिर्यादी श्रीमती समीरा मुशर्रफ खान, वय ३७ वर्षे, व्यवसाय - नोकरी, रा. वृंदावन नगरी बिल्डींग नं. ०८ एच विंग, फ्लॅट नं.१०१ पाम ता. जि. पालघर, मुळ रा. कौटा ता. मिरज जि. सांगली यांनी फिर्याद दिली की, फिर्यादी व त्यांचा जावाई फैज मसुर कुरेशी असे सकाळी ११.३० सुमारास एस बँकचे ए. टी. एम. कार्ड घेऊन बोईसर शिवाजी नगर येथील स्टेट बॅक ऑफ इंडीयाच्या ए.टी.एम. मध्ये गेले होते. सदर ए.टी.एम. मध्ये कार्ड टाकुन ७००० रुपये काढले व त्यानंतर एटीएम मधुन फिर्यादी यांनी कार्ड काढण्याचा प्रयत्न केला असता ए.टी.एम. कार्ड हे अडकून बसले होते. फिर्यादी यांनी ए.टी.एम. काढण्याचा प्रयत्न केला पंरतु एटीएम कार्ड निघाले नाही त्यानंतर ए.टी.एम. रुम मधील आरोपीने लपवून ठेवलेल्या वॉकीटॉकीमधून आवाज आला की, "मै आपको ए.टी.एम. कॅमेरे से देख रहा हुँ । आप ए.टी.एम. मे उंगली मत करो, कार्ड को खिचो मत, क्या समस्या है मुझे बताओ" असे सांगीतले त्यानंतर ए.टी.एम. मधील वॉकीटॉकीमधुन पुन्हा आवाज आला की, "तीन बार पिन डाल कर कॅन्सल और एंटर दबाओ, असे सांगीतल्याने फिर्यादी यांनी तसे केले परंतु ए.टी.एम. मशीम मधुन बाहेर निघाले नाही. तेव्हा ए.टी.एम. रुम मधुन पुन्हा आवाज आला की, "आपका मोबाईल नंबर लिखके वहा रख दो, कल मशीन ऑपरेटर आने के बाद कार्ड निकालकर आपको कॉल करके वापस कर देगा" असे सांगुन फिर्यादी घरी निघुन गेल्यानंतर आरोपी यांनी फिर्यादी यांचे येस बँकेचे डेबिट कार्ड मशीन मधुन काढुन येस बँकेचे ए.टी.एम. व पासवर्ड चोरुन फिर्यादीचे येस बँकेचे खात्यामधुन ९०,०००/- रुपये फसवणुक करुन काढून घेतले आहेत म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन बोईसर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नं । ३९५/२०२६ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३(२),३१८ (४) प्रमाणे दिनांक १४/०९/२०२६ रोजी १९.४६ वाजता गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन श्री. यतिश देशमुख, पोलीस अधीक्षक, पालघर यांच्या मार्गदर्शनाखाली बोईसर पोलीस ठाणेचे तपास पथक तयार केले. सदर पथकाने तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे अनोळखी आरोपीत याचा शोध घेवुन आरोपीस निष्पन्न करुन आरोपीत नामे जितेंद्र रामदेव पाल, वय २६ वर्ष व्यवसाय ड्रायव्हर रा. जयभिम नगर, मनिषनगर, गेट नं.०२ कळवा, पश्चिम, ता.

जि. ठाणे मुळ रा. ग्राम पुरेजनई पो. जसमेढा ता. लालगंज, जि. प्रतापगढ राज्य-उत्तरप्रदेश यास ताब्यात घेवुन त्यास दिनांक १८/०९/२०२६ रोजी अटक करण्यात आली आहे. गुन्हयात फसवणूक केलेली एकुण रक्कमेपैकी ६०,०००/- रुपये रोख व गुन्हा करते वेळी आरोपी यांनी वॉकिटॉकी चा वापर करुन फिर्यादीला फसविले असल्याचे निष्पन्न झाले असून गुन्ह्यात वापरलेले दोन वॉकीटॉकी सेट व वाहन जप्त करण्यात आले आहे. पुढील तपास सहा.पोलीस निरीक्षक/ सुनिल सांळुखे, नेमणुक बोईसर पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदरची कामगीरी ही श्री. यतिश देशमुख, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. विनायक नरळे, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. दिनेश बैसाने, उप विभागीय पोलीस अधिकारी, बोईसर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. सुनिल जाधव, सहा.पोलीस निरीक्षक/सुनिल साळुंखे, पोलीस उपनिरीक्षक/विनय मोरे, पो.हवा/विजय दुबळा, पो.हवा/निरज शुक्ला, पो.हवा/सुनिल मलावकर पो.ना./योगेश गावित, पो.शि/गणेश व्हसकोटी, पो.शि/मयुर पाटील, पो.शि/धिरज साळुंखे पो.शि/देवेंद्र पाटील, पो.शि./मच्छिंद्र घुगे, पो.शि/शुभम सपकाळे, पो.शि/सचिन सोनावणे, पो.शि/रोहित पाटील, पो.शि/किरण वाघ सर्व नेमणुक बोईसर पोलीस ठाणे तसेच पो.शि/१४६८ अक्षय शेट्ये, पो.शि/५७ रुपेश पाटील नेमणुक सायबर पोलीस ठाणे, पालघर यांनी केलेली आहे.